RESEARCH FRONT
Multidisciplinary Peer Reviewed International Journal
ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

# लोकसाहित्य, संस्कृती जतन आणि युवा पिढी सक्षमीकरण

**प्रा. वर्षा पाटोळे**[1]
**श्री शाहू मंदिर महाविद्यालय पर्वती, पुणे - ९**

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.19689502

**प्रस्तावना:** लोकसाहित्य हे एक अमूल्य सांस्कृतिक संपदा आहे. जी आपल्या समाजाचा इतिहास, संस्कृती आणि मूल्याची गाथा सांगते. लोकसाहित्यामध्ये गाणी, कविता, कथा, लोकोक्ती आणि अन्य मौखिक परंपरांचा समावेश होतो. लोकसहित्याचे जतन आणि प्रचार करणे हे आपल्या सांस्कृतिक विरासतीचे रक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकसंस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे लोकसाहित्य होय. पण तरी देखील या लोकसाहित्याचे स्वरूप संमिश्र आणि गुंतागुंतीचे असल्याने त्यात सर्वच समाविष्ट होतील अशी सर्वसामन्य व्याख्या अद्याप झालेली दिसत नाही. लोकसाहित्याचे अभ्यासक, विद्वान आपल्या अभ्यासातून वेगवेगळ्या व्याख्या मांडताना दिसतात. पण तरीही लोकसाहित्य हे लोकांनीच निर्माण केलेले असते हे महत्त्वाचे आहे.

**भारतीय परंपरेत "लोक" या शब्दाचे स्थान:**

१. ऋग्वेदातील प्रसिद्ध पुरुषसुक्तात हा शब्द 'जन' आणि 'स्थान' या दोन्ही अर्थाने वापरलेला आहे.

२. "वैय्याकरण पाणिनी" यांनी आपल्या आष्टाध्यायात 'लोक' व 'सर्वलोक' या पदाचा उल्लेख केलेला आहे.

३. भगवद्गीतेत 'लोक' आणि 'लोकसंग्रह' या शब्दाचा वापर अनेक ठिकाणी केला आहे.

४. अशोकाच्या शिलालेखात 'लोक' हा शब्द व्यापक अर्थाने वापरण्यात आलेला आहे.

डॉ. ना.गो. कालेलकर यांच्या मते "लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग" ही संस्कृती स्वाभाविक जगते आणि निसर्गला अधिक जवळची आहे. "लोक म्हणजे दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तीचा समूह" ज्यांच्यात वंश, भाषा, व्यवसाय किंवा धर्म यापैकी किंवा अधिक समान तत्वे असतात.

"लोकसाहित्याची व्याप्ती: परंपरेने आपोआप पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या सर्व कथा, गीतांना कोणी एकचएक कवी किंवा लेखक नसतोच. सर्व लोकांचे मनच ती कृती घडविते. सर्व लोकांच्या स्मृतीत ती टिकते आणि लोकजीवनात तिचा प्रवाह अखंड व आपोआप चालत राहतो. म्हणून त्या कथांना म्हणायचे लोककथा आणि त्या गीतांना म्हणायचे लोकगीते. या लोककथा आणि लोकगीते यांचे जे निर्माते असतात त्यांना जागे ठेवायचे कामही लोकमतच करीत असते .म्हणून त्याला लोकसाहित्य म्हणतात.

'लोक' हा शब्द नेहमीच बहुवचनात वापरला जातो.

याचाच अर्थ असा की लोक शब्दात समूह अभिप्रेत असतो. एक व्यक्ती अपेक्षित नसते लोक हा समूहवाचक शब्द आहे. मराठीत लोकसाहित्य हा शब्द "Folklore" या इंग्रजी शब्दासाठी वापरला जातो. महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन आणि त्यासंबंधीचे लेखन 818 पासून सुरू झाले १९२० साली कै. वि.का. राजवाडे यांनी लोकगीते, लोककथा हे पारिभाषिक शब्द वापरले होते. दत्तो वामन पोद्दार यांनी इंग्रजीतील Folklore चे भाषांतर म्हणून "लोकविद्या" हा शब्द वापरला. पुढे यासाठी "लोकवाङ्मय" हा शब्द वापरण्यात येऊ लागला. नंतरच्या काळात "लोकसाहित्य" हा शब्द वापरण्याचा परिपाठ सुरू झाला. दुर्गा भागवत यांनी देखील Folklore साठी "लोकसहित्य" हा पारिभाषिक शब्द सुचविलेला आहे.

**लोकसाहित्याचे व्याप्ती:** डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्यांची व्याप्ती पुढील प्रमाणे मांडलीआहे.

**१. मौखिक अविष्कार:** पारंपरिक लोकजीवनातील मौखिक साहित्याचा म्हणजेच कथा, गीत ,भजने, म्हणी,ओव्या, वाक्प्रचार, कथागीत यांचा समावेश होतो. लोकसाहित्याशी संबंधित हा विभाग असल्याने, त्याची व्याप्ती ही व्यापक आहे. जीवन जगत असताना जीवनामध्ये अनेक गोष्टी स्वाभाविकपणे घडत असतात. त्या घटनेचे स्वरूप शब्दाविष्कार हेच असते. लोक गीतांची निर्मिती ही कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक विधीच्या निमित्ताने होते. तर श्रमपरिहारासाठी किंवा रीतीरीवाज म्हणून लोकगीतांची निर्मिती तर धर्मविधी, उपदेश, व्रतवैकल्ये, संस्कार यासाठी लोककथांची निर्मिती म्हणीद्वारे त्यांना जीवन जगत असताना आलेले अनुभव प्रकट होतात. अशा प्रकारे लोकजीवनातील अनेक घटितांच्या माध्यमातून मौखिक अविष्कार होताना दिसतो. मुख्य अविष्कारालाच लोकवाङ्मय असे म्हणतात..

**२. भौतिक संस्कृती:** लोकजीवनामध्ये परंपरेने चालत आलेले व्यवसाय तसेच या पारंपरिक व्यवसायांना लागणारे अवजारे, साहित्य तसेच त्या व्यवसायासाठीचे आवश्यक कौशल्य याचा समावेश भौतिक संस्कृतीत होतो. लोकजीवनात उपयोगात येणाऱ्या वस्तू ,लोकांचे राहणीमान, वेशभूषा, खाद्यपदार्थ कोणत्याही लोकांचे घरे ,गाव मंदिर याची रचना, वनस्पती औषधे या सर्वांचा समावेश भौतिक संस्कृतीत केला जातो.

व्यवसाय वा तत्ससंबंधीचे ज्ञान, कौशल्य हे पारंपरिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होताना दिसते. पारंपारिक विद्या, ज्ञान या दृष्टीने लोकसाहित्य विभागाला महत्त्व प्राप्त होताना दिसते.

**३. लोकरुढी, विधी,समजूती इ.:** लोक जीवनामध्ये रितीरिवाज, प्रथा, परंपरा, लोकविश्वास, लोकभ्रम, प्रसंगानुरूप विविध प्रकारचे विधी यांचा समावेश असतो. .रुढीपरंपरेनुसार लोकमनातील कृती या आविष्कृत होत असतात. या आविष्काराचा लोक मनावरील प्रभावही दिसून येतो. म्हणजेच सभोवताली निसर्गातील दृश्ये वा घटितांचा लोकमाणसांनी कल्पकतेने लावलेले अर्थ व त्यांना कृतीतून दिलेले मूर्त रूप हे आपणास या आविष्कारातून पहावयास मिळते. उदा. गावागावामध्ये सण, उत्सव, जत्रा, यात्रा यामध्ये सामूहिक पातळीवरील केल्या जाणाऱ्या कृती सामूहिक सण, उत्सव, विधी, आचरण पाऊस पडण्यासाठी ग्रामदैवताला कौल लावणे, ग्रामदैवताचे कौल संपादन करण्याचे विधी, उपासना यात्रेतील ग्रामदैवतांचे विधी, लोकमनातील श्रद्धा भयातून निर्माण झालेले नवस, व्रतवैकल्य अशा अनेक गोष्टी लोक माणसात पहावयास मिळतात. लोकमनावर त्यांचा घट्ट पगडा असतो.

अशा या लोकसाहित्याचे महत्त्व पुढील मुद्द्यांच्या आधारे अधोरेखित करता येईल.*

**लोक साहित्याचे महत्त्व :** सांस्कृतिक विरासत - लोकसाहित्य ही आपल्या समाजाच्या सांस्कृतिक विरासतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. लोक साहित्यामध्ये आपल्या समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडते. तसेच लोकसाहित्यमध्ये आपल्या समाजाच्या मूल्यांची शिक्षा दिली जाते . लोकसाहित्यामध्ये आपल्या भाषेचे जतन होत असते.

लोकसाहित्यातून युवा पिढीचे सक्षमीकरण करण्यासाठी अनेक उपाय सांगता येतील.

लोकसाहित्याचा उपयोग शिक्षणासाठी केला जाऊ शकतो. लोकसाहित्यातील कथा, कविता, गाणी यांचा उपयोग विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी केला जाऊ शकतो. लोकसाहित्यचा उपयोग संस्कृतीच्या जतनासाठी केला जाऊ शकतो. लोकसाहित्यातील ज्या कथा, कविता गाणी, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे यांचा उपयोग संस्कृतीच्या जतनासाठी केला जाऊ शकतो. लोकसाहित्याचा उपयोग विकासासाठी केला जाऊ शकतो. माणसाचा विकास झाला तरच देशाचा विकास होणार आहे. त्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास युवा पिढीसाठी उपलब्ध करून देणे व त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे. लोकसाहित्यातील कथा, कविता, गाणी, उखाणे, वाक्प्रचार हे नैतिकतेचा स्त्रोत आहे. त्यासाठी लोकसाहित्याचा उपयोग युवा पिढीमध्ये नैतिकता रुचविण्यासाठी होऊ शकतो. म्हणून लोकसाहित्याचा उपयोग नैतिक शिक्षणासाठी होऊ शकतो. मराठी लोकसाहित्य हे मराठी साहित्यातील अमूल्य ठेव आहे. मौखिक परंपरेतून आलेली कविता, कथा, उखाणे, वाक्प्रचार हे मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी बहुमोल आहे. यासाठी युवापिढीपर्यंत हे लोकसाहित्य पोहोचविणे अत्यंत गरजेचे आहे. तरच मराठी भाषेचे जतन होऊ शकते. कारण मराठी भाषेतील हा लोक साहित्याचा बहुमोल ठेवा मराठी भाषेचे जतन करण्यासाठी उपयोगी येऊ शकतो. प्राचीन काळी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जे मौखिक साहित्य हस्तांतरित होत होते त्यातून भावी पिढी घडत होती व लोकसाहित्य ते संस्कार विचारामुळे समाजात सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत होत होती. आणि आजच्या आधुनिक काळात हाच संस्कारक्षम विचार युवा पिढीमध्ये रोजवायचा असेल तर लोकसाहित्याचा अभ्यास युवा पिढीसाठी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

आजच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून जर तरुणांनी आपले लोकसाहित्य समाजापर्यंत पोहोचविले तर या लोकसाहित्याच्या माध्यमातून तरुणांसाठी अर्थाजनाचा स्त्रोत निर्माण होऊ शकतो. कारण आपल्या मराठी लोक साहित्यातून हे सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय पर्यावरणीय तसेच अनेक चांगले विचार आविष्कृत झाले आहेत.केवळ सर्जनशीलतेच्या जोरावर मौखिक परंपरेतून एक अमूल्य सांस्कृतिक संपदा निर्माण झाली आहे. तर तरुण पिढी याच लोकसाहित्याचा उपयोग आपली सर्जनशीलतेचा विकास करून त्याला आपले उपजीविकेचे साधन बनवू शकते.

लोक साहित्याचा उपयोग पर्यावरण संरक्षणासाठी केला जाऊ शकतो. कारण या लोकसहित्यातून निसर्गाचा सन्मान केलेला दिसून येतो. पूर्वी माणूस निसर्ग पूजा खूप महत्त्वाची मानत होता. त्यामुळे झाडांचे संरक्षण करणे त्याला देवतेचे रूप देऊन त्याची पूजा करणे व त्यावरती मौखिक रूपात कथा, कविता करणे असा पूर्वीचा माणूस निसर्गप्रेमी होता. म्हणून लोकसाहित्य हे निसर्गाच्या अगदी जवळचे आहे. हाच निसर्गप्रेमाचा आदर्श युवापिढीसमोर ठेवला पाहिजे.

तरच पर्यावरण संरक्षण करण्यास मदत होईल. वरील सर्व मुद्दे विचारात घेऊन तरुणांमध्ये त्या मुद्द्यांच्या आधारे लोकसाहित्याचा अभ्यासक्रम तयार करून तो अभ्यासक्रम तरुणांसाठी विविध विद्यापीठातून आणि महाविद्यालयातून विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविला तर युवा पिढीचे योग्यदिशेने सक्षमीकरण होऊ शकते.

**समारोप:** लोकसाहित्याचा उपयोग युवापिढीचे सक्षमीकरण करण्यासाठी करणे महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याचा उपयोग शिक्षण, संस्कृती, विकास, नैतिकता आणि भाषेचे जतनासाठी केला जाऊ शकतो. लोकसाहित्य ही एक अमूल्य सांस्कृतिक संपदा आहे. जी आपल्या समाजाचा इतिहास, संस्कृती आणि मूल्यांची गाथा सांगते. लोकसाहित्याचे जतन आणि प्रचार करणे म्हणजेच आपल्या सांस्कृतिक विरासतीचे जतन आणि प्रचार करणे होय. हे आपल्या सांस्कृतिक विरासतीचे रक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे

लोकसाहित्याचा उपयोग युवापिढीचे सक्षमीकरण करण्यासाठी करणे महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. लोकसाहित्य : एक अभ्यास -डॉ. सरोजिनी बाबर

२. मराठी लोकसाहित्य : डॉ.प्रभाकर मांडे

३. लोकसहित्याची रूपरेखा : डॉ. रामचंद्र देखणे

४. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य : भारतीय संकल्पना आणि परंपरा : अनिल सहस्त्रबुद्धे

५. लोकसंस्कृतीची रंगरूपे : डॉ. अरुणा ढेरे